## PEER REVIEW COMMITTEE

Our Peer review committee scrutinizes and regulates the quality of content to be published, if required the committee invites experts in the field to review and comment on manuscripts received. The manuscripts submitted to our journal first go through an initial screening by the editorial board. Those manuscripts clear the screening is sent to at least two experts for peer review. Peer reviewers independently make a recommendation to the journal editor as to whether the manuscript should be rejected or accepted (with or without revisions). The journal editor considers all the feedback from peer reviewers and makes an informed decision to accept or reject the manuscript.


| | |
|---|---|
| 1) Dr B W Somatkar, HoD English Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 2) Dr Bharat Avhale, Dept of History, R Z College, Malegaon, Dist Washim. |
| 3) Dr D K Rathod, HoD Economics Dept. Gajanan Maharaj College, Borgaon Manju Tq Dist Akola. | 4) Dr D N Badar, Panjabrao Jadhao College, Mehkar. |
| 5) Dr Dilip Arjune, HoD Economics Dept., JES College, Jalna. | 6) Dr G B Ghayal, Librarian Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 7) Dr M R Shinde, HoD Sociology Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 8) Dr P H Barad, Librarian, SPM College, Chikhali, Dist Buldana. |
| 9) Dr P R Junghare, HoD History Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 10) Dr R G Suralkar, HoD Political Science Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 11) Dr Rajesh Maske, Dept of English, RA College, Washim. | 12) Dr S T Kute, HoD Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 13) Dr S V Jadhao, Panjabrao Jadhao College, Mehkar. | 14) Dr Santosh Dhamne, HoD Dept of Economics, TJ College, Washim. |
| 15) Dr Smt L R Jawale, HoD Marathi Dept., R Z College, Malegaon, Dist Washim. | 16) Dr Smt M P Khedekar, HoD Marathi Dept., Uttamchand Bagadia College, Risod, Dist Washim. |
| 17) Dr Smt S M Pawar, HoD Marathi Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 18) Dr Smt V R More, HoD Home Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 19) Dr Umesh Patil, Dept of English, RDG Mahila College Akola. | 20) Dr V P Jadhao, Librarian, TJ Mahavidyalaya, Washim. |
| 21) Dr Vijay Gaikwad, Librarian, Pushpadevi Patil College, Risod, Dist Washim. | |






# Table of Contents


| Sr. No. | Title of the Article | Name of the Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | 'दिनांक २२ मार्च - जागतिक जल दिन' आपल्याला गंभीर परिणामांची जाणीव आहे काय? | प्राचार्य, डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 01 |
| 2 | कसे अभ्यासावे विज्ञान? | डॉ. शेख एम. डब्ल्यू. एच. मुख्याध्याक जि. प. हायस्कूल अर्धापूर जि. नांदेड. | 04 |
| 3 | E-Learning as a Solution for Teaching English Language | Prof. Dr. B.W.Somatkar HoD, Dept. of English Smt. Sindhutai Jadhao Arts and Sci. College Mehkar. Dist- Buldana. | 06 |
| 4 | सावित्रीबाई फुले यांच्या प्रमाणेच समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी लढणारी दुर्दम्य इच्छाशक्ती असणारी मुस्लिम स्त्री म्हणजे फातिमा शेख. | डॉ जयश्री लक्ष्मणराव भोसीकर, सहाय्यक प्राध्यापक, सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय, विष्णूपुरी, नांदेड. | 9 |
| 5 | आदिवासी विकासातील अडथळे | प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | 12 |
| 6 | आदिवासी विकासाचे दृष्टीकोन | प्रा.अभय जायभाये एन.एस.एस.संचालक शिवाजी विद्यापिठ, कोल्हापुर | 16 |
| 7 | आदिवासींच्या विकासाबाबत घटनात्मक तरतूदी | प्रा.डॉ. आर.जी.सुरळकर श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | 19 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | क्रीडा शिक्षण | प्रा. डॉ. संगीता मंगेश खडसे<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय मेहकर, जि.बुलढाणा. | 23 |
| 9 | गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून स्वयंरोजगार व स्त्री सक्षमीकरण | प्रा. डॉ. वैशाली रा. मोरे<br>गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय<br>मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 25 |
| 10 | संतांची ईश्वरविषयक संकल्पना | प्रा. डॉ. सविता माधवराव पवार<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय, मेहकर. | 28 |
| 11 | ICT Skills and Competencies of Librarians in Colleges of Sant Gadge Baba Amravati University, Amravati | Dr Gajanan Baliram Ghayal<br>Director knowledge resource centre shrimati Sindhutai Jadhav Arts and Science Mahavidyalay Mehkar district Buldhana. | 32 |
| 12 | गणित विषय अध्ययनातून विद्यार्थ्यांत संक्रमित होणारी मूल्य | श्री चव्हाण नवीन लिंबराज<br>सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव,<br>ता. माजलगाव, जि.बीड. | 39 |
| 13 | कोरोना के परिप्रेक्ष्य में : बदल गये दस्तूर | प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार, सोलापुर,<br>महाराष्ट्र 9423330737 | 41 |
| 14 | लोकसंख्या वाढ भारतीय अर्थ व्यवस्थे समोरील आव्हान | डॉ. धनाजी दगडूराव खेबडे<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड. | 45 |
| 15 | **Tanqeer Aur Naqqad** | Siraj Anwar Mohammed Miran<br>Secondary Teacher<br>Z.P. High School, Tamsa Nanded. | 47 |
| 16 | जीवन में खेल कूद का महत्व | श्री प्रलोभ माधवराव कुलकर्णी<br>शारीरिक शिक्षक<br>जि.प.हा. वाघी, ता. जि. नांदेड. | 54 |




ISBN 978-93-93079-05-3 Asian Journal of Multidisciplinary Research Studies | Jan - 2022

01

## 'दिनांक २२ मार्च - जागतिक जल दिन' आपल्याला गंभीर परिणामांची जाणीव आहे काय?

प्राचार्य, डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलडाणा.

**प्रास्ताविक :**

भूजल अदृश्य आहे, परंतु त्याचा प्रभाव मात्र सर्वत्र दृश्य स्वरूपात दिसून येतो. आपल्या दृष्टीपथात नसलेले, आपल्या पायाखालचे, भूजल हा एक अदृश्य खजिना आहे जो आपले आणि समस्त जीवसृष्टीचे जीवन समृद्ध करतो. जगातील जवळजवळ सर्व भूजल हे गोडे पाणी आहे. जसजसे हवामान बदलत जाईल तसतसे भूजल साठया चे अस्तित्व अधिकाधिक गंभीर होत जाईल. या अमूल्य संसाधनाचे शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी संकलीतरीत्या काम करणे आवश्यक आहे. भूजल जरी दृष्टीआड असले, तरी ते विचारांच्या आड जाता कामा नये.

पृथ्वीवर बऱ्याच भागात भूजलाचा वारेमाप वापर होत आहे, भूजल साठयाचे पाऊस आणि बर्फाने पुनर्भरण होण्यापेक्षा, जल साठयामधून काढले जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण भरमसाठ आहे. या बरोबरच भूजल प्रदूषण ही एक अत्यंत गंभीर अशी जगाला भेडसावणारी समस्या आहे ज्यातून बरे होण्यासाठी अनेक दशके किंवा शतकेही लागू शकतात. काही ठिकाणी, जमिनीखालचे भूजलसाठे किती शिल्लक आहे हे आपल्याला माहीत नाही, याचा अर्थ आपण या अत्यंत महत्त्वाच्या जलस्रोतांचा नियोजन पूर्वक उपयोग करण्यात अयशस्वी झालो आहोत. भूजलाचा शोध, संरक्षण आणि शाश्वत वापर करणे या बाबी जगण्यासाठी आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी सोबतच वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे.

मुख्य शब्द : जागतिक जल दिन, भूजल, भूजलाचा शोध, संरक्षण आणि शाश्वत व्यवस्थापन, हवामान बदल, जाणीव जागृती.

**जागतिक जल दिन म्हणजे काय?**

जागतिक जल दिन दरवर्षी २२ मार्च रोजी साजरा केला जातो. सन 1993 मध्ये सुरू झालेली ही वार्षिक प्रथा म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या एकत्रित निर्देशांचे पालन आहे. याद्वारे पृथ्वीवर जे दोन अब्ज सुरक्षित पाण्याच्या उपलब्धते शिवाय जगत आहेत त्यांच्यात भूजलाचा शोध, संरक्षण आणि शाश्वत व्यवस्थापन बद्दल जागरूकता वाढवते. जागतिक जल दिनाचे मुख्य लक्ष म्हणजे शाश्वत विकास लक्ष्य (Sustainable Development Goal -SDG) यानुसार सन 2030 पर्यंत सर्वांसाठी सुरक्षित जल आणि स्वच्छता या दिशेने कृती करण्यास लोकांना प्रेरित करणे हे आहे.

म्हणूनच भूजलाचे प्रदूषणापासून संरक्षण केले जाणे, लोकांच्या आणि पृथ्वीच्या गरजा संतुलित करून भूजलाचा शाश्वत वापर केला जाणे, स्वच्छता व्यवस्था, शेती, उद्योग, परिसंस्था आणि हवामान बदल अनुकूलन यामध्ये भूजलाची महत्त्वाची भूमिका शाश्वत विकास धोरणात प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे.

**जागतिक जल दिनाचे महत्त्व:**

अंदाजे 780 दशलक्ष लोक स्वच्छ, पिण्याच्या पाण्याविना जगतात. ते दूषित पाणी प्यायल्याने अनेक जीवघेण्या आजरांशी लढत आहेत. ही तिसऱ्या जगाची समस्या वाटू शकते,

परंतु फ्लिंट, मिशिगनने दाखवून दिले की पाण्याची समस्या अगदी युनायटेड स्टेट्समध्ये सुद्धा आहे. फक्त माणसांनाच स्वच्छ पाणी मिळण्याची गरज असते असे नाही तर दरवर्षी जलप्रदूषणामुळे असंख्य वन्यप्राणी सुद्धा मरतात. कचरा ते सांडपाणी आणि वाहून येणारी रसायने अशा अनेक प्रकारे जल प्रदूषण होऊ शकते, त्यामुळे पाणी पिण्यासाठी अवलंबून असलेल्या प्राण्यांसाठी प्रदूषित जलसाठे विषारी बनतात. पाण्याचा इतर अनेक पर्यावरणीय समस्यांशी सुद्धा संबंध येतो. यामुळेच पाण्याच्या संकटांवर नैसर्गिक उपाय शोधण्यासाठी "पाण्यासाठी निसर्ग" ही जागतिक जल दिनाची वार्षिक थीम समर्पित आहे. आपण ज्या पर्यावरणीय समस्यांचा सामना करत आहोत त्यापैकी अनेक हवामानातील बदल आणि परिसंस्थेचा ऱ्हास, जलप्रदूषण, पूर आणि दुष्काळ यांच्याशी संबंधित आहेत. या संकटावर मात करावयाची असल्यास त्याच्या गंभीर परिणामांची जाणीव करून देणे आणि त्यातून नैसर्गिक जलसाठे संरक्षण व संवर्धन करण्याची वृत्ती मानवात विकसित करणे काळाची गरज आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी, जल दिनानिमित्त संशोधकाने तयार केलेली 15 विधाने व प्रत्येकी 4 पर्याय असणारी चाचणी प्रतिसादकांना ऑनलाईन पाठविण्यात आली. प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार प्रत्येक विधानाच्या अचूक पर्यायास 2 गुण याप्रमाणे चाचणीस गुणदान करण्यात आले. प्राप्त माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**प्रतिसादक विश्लेषण:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी उपयोगात आणलेल्या चाचणीस प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाची एकूण संख्या 478 होती, 30 पैकी 30 गुण घेणाऱ्या प्रतिसादकांची संख्या 53 आहे, 30 पैकी 28 गुण घेणाऱ्या प्रतिसादकांची संख्या 80 आहे, 30 पैकी 26 गुण घेणाऱ्या प्रतिसादकांची संख्या 108 आहे, 30 पैकी 24 गुण घेणाऱ्या प्रतिसादकांची संख्या 80 आहे, 30 पैकी 22 गुण घेणाऱ्या प्रतिसादकांची संख्या 55 आहे, 30 पैकी 20 आणि 20 पेक्षा कमी गुण घेणाऱ्या प्रतिसादकांची संख्या 104 आहे, याचा वक्र सामन्यत: प्रसामान्य संभव वक्र आहे.

चाचणीतील विधानास प्राप्त प्रतिसादानुसार आलेले **निष्कर्ष**

एकूण प्रतिसादकांपैकी ---

1. सुमारे 77% प्रतिसादक पाण्यास संपत्ती पेक्षा मौल्यवान मानतात.
2. सुमारे 77% प्रतिसादक पाण्यास जीवसृष्टीच्या मूलभूत गरजा पैकी एक मानतात.
3. सुमारे 93% प्रतिसादकांना 22 मार्च हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक जल दिन म्हणून साजरा करावा असे सूचित केल्याचे ज्ञात आहे.
4. सुमारे 96% प्रतिसादक नळातून वाया जाणाऱ्या पाण्याची डोळयातून पाणी येऊ नये म्हणून काळजी घेतली जाते तशी काळजी घ्यावी असे मानतात.
5. जलसाक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी पावसाच्या पाण्याची साठवणूक करणे, भूजलाची पातळी कशी वाढवता येईल यासाठी प्रयत्न करणे याविषयी प्रबोधन आवश्यक आहे असे सुमारे 66% प्रतिसडकांचे मत आहे.
6. सुमारे 57% प्रतिसादकांच्या मते जलसाक्षरता म्हणजे जलसाठयावरील आक्रमण थांबवणे,





त्यांचे संवर्धन करणे, जल प्रदूषण थांबवणे, पाण्याच्या पुनरवापरावर भर देणे होय.

7. सुमारे 94% प्रतिसादक हे जाणतात की, आपण पाणी वाचवू शकतो पण पाणी बनवू शकत नाही.
8. सुमारे 95% प्रतिसादक देश वाचवायचा असेल तर पाणी वाचवणे आवश्यक मानतात.
9. सुमारे 88% प्रतिसादक पाण्याचा वापर करणे आपण थांबवू शकत नाही पण पाण्याचा सुयोग्य व सुनियोजित वापर करून पाणी वाचवू शकतो हे मानतात.
10. स्वच्छ व ताज्या पाण्याच्या नैसर्गिक स्रोतांची काळजी घेणे आणि त्यांच्या शाश्वत संरक्षणासाठी कार्य करणे हा संदेश देणे यासाठी या जल दिवसाची योजना केली गेली आहे असे 96% प्रतिसादक मानतात.
11. पृथ्वीवर 71% पाणी असलं तरी पिण्यायोग्य पाणी फारच कमी आहे याची जाणीव 77% प्रतिसादकांना आहे.
12. सुमारे 90% प्रतिसादकांना पृथ्वीवर उपलब्ध एकूण पाण्यापैकी बहुतांश पाणी समुद्रात आहे परंतु ते पिण्या योग्य नाही याची जाणीव आहे.
13. जगातील 80% लोक आजही शुद्ध पाण्यापासून वंचित आहेत ही बाब सुमारे 84% प्रतिसादकांना ज्ञात आहे.
14. जगातील दरवर्षी, पाच वर्षाखालील 700 मुले जुलाब-हगवण-डायरिया यासारख्या अशुद्ध पाण्यामुळे होणाऱ्या आजाराने मरतात याची 84% प्रतिसादकांना जाणीव आहे.
15. जर पाणी अश्याच प्रकारे प्रदूषित झालं तर मानवच नव्हे तर समस्त प्राणीसृष्टी धोक्यात येऊ शकते असे 97% प्रतिसादक मानतात.

**समारोप:**

जलप्रदूषण म्हणजे पाण्याच्या स्रोतांमध्ये दूषित पदार्थ मिसळणे, ज्यामुळे पाणी पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी, साफसफाई साठी, पोहणे आणि इतर कामांसाठी निरुपयोगी बनते. या प्रदूषकांमध्ये रसायने, कचरा, जीवाणू आणि परजीवी यांचा समावेश होतो. जलप्रदूषणामुळे जलीय परिसंस्थेचा ऱ्हास होतो, पिण्यायोग्य पाण्याचा अभाव निर्माण होतो, विविध आजार व साथीचे रोग पसरतात, जल प्रदूषण कमी करणे आणि स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी मिळवण्यासाठी नागरिकांची पाणी वापराची कार्यक्षमता सुधारणे आणि त्यांच्या वृत्ती आणि वर्तनात बदल करणे आवश्यक आहे. हाच जलदिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश आहे.

**संदर्भ:**


- https://www.iberdrola.com/sustainability/water-pollution
- https://www.hsph.harvard.edu/
- https://www.frontiersin.org/articles/10.3389/fenvs.2020.581591/full
- Researches in water pollution: a review, Anil K Dwivedi
- https://www.worldwaterday.org/




Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao Coll· ge
Mehkar,Dist.Buldana